# जनसंपर्क अधिकारी
मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट २८१ - २२ दिनांक १६/०९/२०२२

## ३ अपहरीत मुलीचा २४ तासात शोध घेवुन त्यांना त्यांचे पालकांचे ताब्यात देण्यात पेल्हार पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण पथकास यश.

पेल्हार पोलीस ठाणे हद्दीत दिनांक १४/०९/२०२२ रोजी दुपारी १२.०० वाजताचे सुमारास वलईपाडा, नालासोपारा (पुर्व) येथुन ३ अल्पवयीन मुलींना कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांच्या अज्ञानाचा फायदा घेवुन अमिष दाखवुन फिर्यादी यांचे कायदेशीर रखवालीतुन पळवून नेलेबाबत तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पेल्हार पोलीस ठाणे येथे गु.रजि.नं. I ७८६/२०२२ भा.दं.वि.सं. कलम-३६३ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचे गांभिर्य लक्षात घेवुन पेल्हार पोलीस स्टेशनच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी तात्काळ गुन्हयाचे घटनास्थळी भेट देवुन घटनास्थळावर मिळालेल्या माहितीचे आधारावर अपहरत मुलीपैकी एका मुलीस सुरत, गुजरात राज्य येथुन व दोन मुलीस वापी, गुजरात राज्य येथुन २४ तासाचे आत ताब्यात घेवुन सदर मुलींना सुखरुप त्याचे पालकांचे ताब्यात देण्यात आले असुन पुढील योग्य ती कायदेशिर कारवाई पोउपनिरी/अनिल म्हस्के हे करीत आहेत.

सदरची कामगिरी श्री. प्रशांत वाघुंडे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ३, श्री. रामचंद्र देशमुख, सहायक पोलीस आयुक्त, विरार विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री. विलास चौगुले, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पेल्हार पोलीस ठाणे, श्री. महेंद्र शेलार, पोलीस निरीक्षक (गुन्हे), गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पो.उप.नि. सनिल पाटील, पो.हवा. योगेश देशमुख, तुकाराम माने, तानाजी चव्हाण, पोना/प्रताप पाचुंदे, पो.अं. संदिप शेळके, मोहसिन दिवाण, सचिन बळीद, रोशन पुरकर, किरण आव्हाड, बालाजी गायकवाड, तसेच पो.हवा. नामदेव ढोणे, पो.उ.आ. कार्यालय, विरार ३ यांनी पार पाडलेली आहे.

----------------ooooo-------------------